# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 18/11/2019 (सोमवार)
# (सायंकाळ)

---

## अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावरील कोंढाळी नागपूर अमरावती रोड येथे दिनांक 17/11/2019 चे 14:20 वा. दरम्यान जिजे– 12/बीटी–5815 क्रमांकाचा टँकरचा चालक आरोपी नामे– सोनु मनोज दुबे(मृतक), वय 25 वर्ष, रा. परोली, ता. फरूकाबाद (उ.प्र) हा नागपूर ते अमरावतीकडे रासायनिक द्रव्यानी भरलेला टँकर घेवून जात होता. कोंढाळी जवळ टँकर डिवायडरला धडकल्याने पलटी झाला व लगेच टँकरला पेट घेतल्याने टँकर पुर्णपणे जळाला. या अपघातात टँकरचा चालक सोनु दुबे स्वतःच्या मरणास कारणीभूत ठरला.

सदर प्रकरणी सफौ दिलीप इंगळे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक ढगे 9518979499 हे करीत आहे.

2) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावरील मौजा नाळेकर शाळेसमोर येथे दिनांक 11/11/2019 चे 18:00 वा. ते 18:15 वा. दरम्यान फिर्यादी हे त्यांची आई नामे– आशा शंकर पकडे, वय 58 वर्ष, रा. नरखेड यांच्या सोबत पल्सर मोटरसायकलने शेतातुन घरी परत येत होते. दरम्यान एमएच– 40/पी–1873 क्रमांकाच्या ऑटोचा आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादींच्या मोटरसायकलला अमोरा–समोर धडक दिली. या अपघातात फिर्यादींच्या मोटरसायकलच्या मागे बसलेल्या आशा पकडे या जखमी झाल्या. त्यांचा उपचारा दरम्यान 15/11/2019 चे 11:30 वा. मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– हेमंत शंकरराव पकडे, वय 32 वर्ष, रा. वार्ड क्र. 10, नरखेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मनोज गाढवे 8805405107 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर